<u>ई–फायलींग</u>

MHAU080030642024

नियमीत दिवाणी दावा क्र. १९२/२०२४
साबेर खान वि. शकीला बेगम
नि. क्र. ०८ चा भाग

<u>वादीतर्फे सा. क्र. १ साबेर खान सिकंदर खान यांचा नि.क्र. ०८ वरील पुढील सरतपास विधीज्ञ श्रीमती एन. एम. खान यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरु–</u>

आता मला माझे नि.क्र. ०८ वरील ऑनलाईन पध्दतीने दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

<u>सरतपास पूर्ण.</u>
<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. आय. मंडलेचा यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>

मला मराठी वाचता येत नाही. मी पुराव्याचे शपथपत्र वाचुन पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात काय लिहले आहे हे मला माहित नाही. प्रतिवादीसोबत माझे लग्न सन २०१० मध्ये अकराव्या महिन्यात इस्तेमामध्ये (सामुहिक विवाह) झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अजिंठा येथे राहतो आणि प्रतिवादीचे माहेर देखील अजिंठा आहे. शकीला बी आणि मला तीन मुले आहेत. त्यातील मोठ्याचे नाव शाकेर, दुसऱ्याचे मोहम्मद साहिल आणि मुलीचे नाव शिफा असे आहे. मी आणि प्रतिवादी चार वर्षांपासुन वेगळे राहत आहे.

हे मला माहित नाही की, मी प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादीने माझ्याविरुध्द महिला दक्षता समितीकडे तक्रार केली होती आणि कौटूंबिक हिंसाचार कायद्याप्रमाणे व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे सन २०२३ मध्ये केसेस केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तिन्ही अपत्ये शकीला बी हिचेकडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शकीला बी हिचे वडील मोलमजुरी करतात. हे म्हणणे खरे नाही की, तिचे माहेरची परिस्थीती गरीबीची आहे. साक्षीदार सांगतो की, गरीबीची आहे पण एवढी पण गरीबीची नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे कुटूंबात मी, माझे आई–वडील असे

एकत्र राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण अजिंठा येथेच राहते.

हे म्हणणे खरे नाही की, मी जनावरांचा व्यापार करतो. मी शकीला बी हिला नांदायला येण्याकरिता नोटीस पाठवली होती. मी सदर नोटीसची प्रत दाखल करु शकत नाही. मी कोणत्या तारखेला नोटीस पाठवली हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शकीला बी जेव्हापासुन माहेरी राहत आहे तेव्हापासुन मी आजपर्यंत तिला एक पैसा दिलेला नाही.

**मध्यांतरामुळे उलटतपास तहकुब**
**मध्यांतरानंतर उलटतपास शपथेवर पुढे सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने आणि मी एकमेकांविरुध्द केस करण्यापूर्वी मी प्रतिवादीस चांगले नांदवावे करिता प्रतिवादीने गावामध्ये बैठक बोलवली होती, मात्र त्यामध्ये तडजोड झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी २०२३ मध्ये शकीलाबी हिला मारझोड करुन मुलांसह घरातुन हाकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, शकीलाबी ने माझ्याविरुध्द महिला तक्रार निवारण समितीकडे आणि कोर्टामध्ये केसेस केल्यानंतर मी एक वर्षानंतर तिचेविरुध्द प्रस्तुत खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दावा दाखल करण्याच्या एक वर्षापूर्वी शकीलाबी ने माझ्याविरुध्द कोर्टात केसेस केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शकीला बी आणि मुलांना खावटी द्यावी लागु नये आणि माझ्यावरची जबाबदारी संपुष्टात यावी करिता मी एक वर्षाच्या कालावधीनंतर प्रस्तुत खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.03.25 16:28:50 +0530

(कैलास त्र्यं. अढायके)

दिनांक –२५/०३/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सिल्लोड.